# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक आरोग्य विभाग
# वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची पदे भरण्यासाठी
# स्वतंत्र निवड मंडळ

---

संदर्भ :

१. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.आरटीआर-१०९१/प्र.क्र.२२६/सेवा-३, दिनांक ३० ऑक्टोबर, २०००
२. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/४५८/प्र.क्र.३७५/०७/सेवा-३, दिनांक २१ मे, २००९
३. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/प्र.क्र.३७५/सेवा-३, दिनांक १० जून, २००९
४. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७/सेवा-३(नि.मं.), दिनांक ०२ नोव्हेंबर, २०११
५. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दिनांक १४ डिसेंबर, २०११
६. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/७८९/सेवा-३, दिनांक १८ जुलै, २०१३
७. शासनपत्र सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. म.वै.अ-१११३/७८९/४४५/१३/सेवा-३, दिनांक २७ सप्टेंबर २०१३
८. शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.म.वै.अ.-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा-३, दिनांक ३ ऑक्टोबर २०१३

---

**जाहिरात क्रमांक : ०१ /२०२४** **नस्ती क्रमांक : मवैअ-२०२२/प्र.क्र. ३०३ /सेवा-३**

---

वैद्यकीय अधिकारी, गट-अ (सातवा वेतन आयोग वेतनस्तर, एस-२०:- रु.५६,१००-१,७७,५००) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-"अ" (एस-२०) या संवर्गातील **"वैद्यकीय अधिकारी"** या पदावरील भरतीकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट - "अ" या संवर्गातील **"वैद्यकीय अधिकारी (एस-२०)"** या पदावर सरळसेवेने पदभरती करण्यासाठी http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण जाहिरात / अर्जाबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार उमेदवारांनी https://www.morecruitment.maha-arogya.com या संकेतस्थळावर सदर अर्ज पूर्णपणे ONLINE पद्धतीने भरावयाचे आहेत.

३. उमेदवारांनी ONLINE अर्जासोबत खाली नमूद केलेल्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्व-साक्षांकीत प्रती UPLOAD करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

३.१ जन्म प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र

३.२ महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे (अधिवास/Domicile) प्रमाणपत्र

३.३ राखीव प्रवर्गातून अर्ज केल्यास जात व जात वैधता प्रमाणपत्र

३.४ राखीव प्रवर्गातून अर्ज केल्यास लागू असेल त्या प्रवर्गास शासकीय नियमानुसार आवश्यक असलेले Non-Creamy-Layer प्रमाणपत्र.

३.५ खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता, खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील माहिलांनी Non-Creamy-Layer प्रमाणपत्र सादर करण्याबाबत महिला व बालविकास विभाग, शा.नि.क्र.महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/कार्या-२, दि.०४.०५.२०२३ मधील तरतुदी लागू राहतील.

३.६ जाहिरातील परिच्छेद ८.४ नुसार आंतरवासिता (Internship) पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

३.७ अर्जाच्या दिनांकास वैध असलेले महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडील (MMC/NMC) नोंदणी प्रमाणपत्र /Renewal receipt

३.८ जाहिरातील परिच्छेद ९.३ व ९.४ नुसार अनुभव प्रमाणपत्र

३.९ स्वत:चा पासपोर्ट साईजचा फोटो (140 pixel height and 100 pixel width) (10 MB पेक्षा जास्त नसावा)

३.१० स्वस्वाक्षरीचा नमुना (JPEG file) (50 pixel height and 100 pixel width) (10 MB पेक्षा जास्त नसावा)

३.११ आधार कार्ड

३.१२ परदेशातुन एमबीबीएस पदवी घेतलेल्या उमेदवाराची NBE गुणपत्रिका

३.१३ वैद्यकीय पदवीच्या सर्व वर्षांच्या गुणपत्रिका, पदवी/पदव्युत्तर पदविका/पदव्युत्तर पदवी यांचे प्रमाणपत्र

३.१४ दिव्यांगाचे प्रमाणपत्र (Online certificate) (दिव्यांग असल्यास)

३.१५ खेळाडू प्रर्वगातुन अर्ज करीत असल्यास, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.०१.०७.२०१६ , तसेच शासन शुध्दीपत्रक शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.१८.०८.२०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्र.संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रियुसे-२, दि.३०.०६.२०२२ व तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूचे प्रमाणपत्र तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.०१.०७.२०१६, मधील सर्वसाधारण अर्हतामधील मुद्दा क्र. ४ (V) नुसार अर्जासोबत विभागीय उपसंचालक यांनी क्रिडा

प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणीत केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

३.१६ उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल असल्यास त्याबाबतची कागदपत्रे अपलोड करावीत. (एफआयआर, इत्यादी)

***(Document PDF files should not be more than 10 MB each.)***

४. **पदसंख्या:**

खालील तक्त्यांत (तक्ता क्र. ४.१, ४.२ ) दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी,गट-अ (एस २०) यांच्या एकूण १७२९ पदांसाठी (सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेता) जाहिरात देण्यात येत असुन त्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**तक्ता क्र. ४.१ - एम.बी.बी.एस. व पदव्युत्तर पदवी / पदविका (एकूण-१४४६ पदे)**

| प्रवर्ग | अ.जा (१३%) | अ.ज. (७%) | वि.जा. (अ) (३%) | भ.ज. (ब) (२.५%) | भ.ज. (क) (३.५%) | भ.ज. (ड) (२%) | विमाप्र (२%) | इमाव (१९ %) | आदुघ (EWS) (१०%) | खुला (३८%) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | १८५ | ९९ | ४८ | ३९ | ५६ | ३८ | ३५ | २५९ | २२० | ४६७ | **१४४६** |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १२० | ६४ | ३२ | २५ | ३६ | २५ | २२ | १६८ | १४३ | ३०४ | **९३९** |
| महिला | ५६ | ३० | १४ | १२ | १७ | ११ | ११ | ७८ | ६६ | १४० | **४३५** |
| खेळाडू | ९ | ५ | २ | २ | ३ | २ | २ | १३ | ११ | २३ | **७२** |
| दिव्यांग | **एकूण ५८* पदे अस्थिव्यंग**<br>O.L.-One Leg (upto 50% disability will be able to walk using walking aid, dominant extremity not involved.) | | | | | | | | | | |
| अनाथ | **एकूण १४ पदे** | | | | | | | | | | |

**तक्ता क्र. ४.२ - बी.ए.एम.एस. व पदव्युत्तर पदवी / पदविका (एकूण-२८३ पदे)**

| प्रवर्ग | अ.जा (१३%) | अ.ज. (७%) | वि.जा. (अ) (३%) | भ.ज. (ब) (२.५%) | भ.ज. (क) (३.५%) | भ.ज. (ड) (२%) | विमाप्र (२%) | इमाव (१९ %) | आदुघ (EWS) (१०%) | खुला (३८%) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | ३६ | १९ | ९ | ८ | ११ | ७ | ७ | ५१ | ४३ | ९२ | **२८३** |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २३ | १२ | ६ | ६ | ७ | ५ | ५ | ३३ | २८ | ५९ | **१८४** |
| महिला | ११ | ६ | ३ | २ | ३ | २ | २ | १५ | १३ | २८ | **८५** |
| खेळाडू | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | २ | ५ | **१४** |
| दिव्यांग | **एकूण ११* पदे अस्थिव्यंग**<br>O.L.-One Leg (upto50% disability will be able to walk using walking aid, dominant extremity not involved.) | | | | | | | | | | |
| अनाथ | **एकूण ३ पदे** | | | | | | | | | | |

जाहिरातीत नमूद पदांच्या संख्येत वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे. सदर अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

टिप:

१. उपरोक्त तक्त्यात दिव्यांगांसाठीची ६९ पदे (तक्ता अ व ब मधील एकूण) सा आ.वि., शा.नि. क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१०३/सम-२, दि.२२.११.२०२१ मधील तरतुदीनुसार अस्थिव्यंग O.L.-One Leg (upto 50% disability will be able to walk using walking aid., Dominant extremity not involved.) या संवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात येत आहेत. तसेच * उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात दिव्यांगाचे ते पद दर्शविण्यात येईल.)

२. उपरोक्त तक्त्यात अनाथांसाठीची १७ पदे (तक्ता अ व ब मधील एकूण) महिला व बालविकास विभाग, शा.नि. क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२३.०८.२०२१ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील. तसेच * उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात अनाथांचे ते पद दर्शविण्यात येईल.)

३. वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) साठी राखीव पदे आंतरपरिवर्तनीय असून वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) चे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. तर शासन आदेशानुसार सदर पदे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) मधून आंतरपरिवर्तनीय नियमानुसार भरण्यात येतील)

४. या पदभरती प्रक्रियेस नियमाप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षण राहील. महिला, खेळाडू, दिव्यांग व अनाथ यांचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.१ महत्वाच्या सूचना -

४.१.१ वैद्यकीय अधिकारी अनधिकृत गैरहजर आहेत अथवा ज्या अनधिकृत गैरहजर अधिकाऱ्यांना शासनाने एक संधी म्हणून पुन्हा पदस्थापना दिलेली आहे. परंतु त्या ठिकाणी असे वैद्यकीय अधिकारी रुजू न झाल्यास व त्यांनी या प्रक्रियेत अर्ज केल्याचे कोणत्याही टप्यात निदर्शनास आल्यास त्यांचा अर्ज तात्काळ रद्दबातल करण्यात येईल. तसेच त्यांनी सदर माहिती लपवून नियुक्ती आदेश घेतल्यास व तद्नंतर सदर बाब उघडकीस आल्यास त्यांच्या नवनियुक्त सेवा तत्काळ समाप्त करण्यात येतील.

४.१.२ ज्या वैद्यकीय अधिकारी यांनी यापूर्वी शासनामार्फत अथवा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नियमित वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक आदेश घेतले आहेत व नंतर कोणत्याही कारणास्तव परिपूर्ण राजीनामा अर्ज सादर करुन जाहिरातीच्या दिनांकास १ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असेल अशा उमेदवारांचे अर्ज ग्राहय धरले जातील.

४.२ तक्ता ४.१ मध्ये जाहीर करण्यात आल्यानुसार एम.बी.बी.एस. अर्हता धारण करणाऱ्या १४४६ **“वैद्यकीय अधिकारी-गट अ (एस-२०)”** पदांवर खालील नमूद विशेषज्ञ शाखेतील पदव्युत्तर पदविका / पदवीधारक उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात येईल:-

१) अतिविशेषोपचार तज्ञ
२) बालरोग तज्ञ
३) भिषक
४) भूल तज्ञ
५) स्त्रीरोग तज्ञ
६) शल्य चिकित्सक
७) कान नाक घसा तज्ञ
८) नेत्ररोग तज्ञ
९) अस्थीव्यंगोपचार तज्ञ
१०) त्वचारोग तज्ञ

११) शरीरविकृती तज्ञ
१२) रक्तसंक्रमण अधिकारी
१३) क्ष-किरण तज्ञ
१४) मानसोपचार तज्ञ
१५) पी.एस.एम.
१६) फॉरेन्सिक मेडीसीन
१७) क्षयरोग तज्ञ

४.३ तक्ता क्र. ४.२ मध्ये जाहीर करण्यात आल्यानुसार बीएएमएस अर्हता धारण करणाऱ्या २८३ **"वैद्यकीय अधिकारी-गट अ (एस-२०)"** पदांवर पदव्युत्तर पदविका/पदव्युत्तर पदवीधारक उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात येईल.

४.४ उपरोक्त परिच्छेद ४.२ मध्ये नमूद विषयांच्या पदांची संख्या संपल्यानंतर अथवा पदे उपलब्ध नसल्यास अशा उमेदवारांची गणना (उमेदवारांनी अर्जामध्ये तसा विकल्प दिला असेल तर) निव्वळ MBBS उमेदवार म्हणून करण्यात येईल व त्यांची पदस्थापना प्राधान्याने प्राथमिक आरोग्य केंद्रे व प्राथमिक आरोग्य पथके येथे करण्यात येईल, तसेच त्यांना ३/ ६ अतिरिक्त वेतनवाढी नियुक्तीच्या वेळी लागू राहणार नाहीत. तथापि, भविष्यात शासकीय धोरणाप्रमाणे त्या अनुज्ञेय असतील.

४.५ उपरोक्त परिच्छेद ४.२ मध्ये नमुद विषयांव्यतिरिक्त इतर विषयातील पदवी किंवा पदविका किंवा समकक्ष प्रमाणपत्रे धारण केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करु नये. तथापि, त्यांची गणना निव्वळ MBBS उमेदवार म्हणून करावयास त्यांची सहमती असेल तर त्यांनी त्याप्रमाणे निव्वळ एम.बी.बी.एस. उमेदवार म्हणून अर्ज सादर करावा. अशा उमेदवारांची पदस्थापना गुणवत्तेनुसार प्राधान्याने प्राथमिक आरोग्य केंद्रे व प्राथमिक आरोग्य पथके येथे करण्यात येईल, तसेच त्यांना ३/६ अतिरिक्त वेतनवाढी लागू राहणार नाहीत.

**५. दिव्यांगासाठीचे आरक्षण:**

सा.आ.वि., शा.नि. क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०३/सम-२, दि.२२.११.२०२१ मधील तरतुदीनुसार दिव्यांग उमेदवारामधील फक्त अस्थिव्यंग O.L.-One Leg ( upto 50% disability will be able to walk using walking aid, dominant extremity not involved.) उमेदवारच सदर पदासाठी पात्र असून जो उमेदवार अश्या प्रकारच्या दिव्यांग स्पष्टपणे नमूद केलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे ONLINE पद्धतीने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करेल त्याच उमेदवाराचा सदर भरती प्रक्रियेत विचार होईल.

६. **वेतनश्रेणी** :

सातवा वेतन आयोग (वेतनस्तर, एस-२० रु.५६१००-१७७५००) नुसार वेतन अनुज्ञेय राहील.

**७. वयोमर्यादा :**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | किमान अमागास / मागासवर्गीय / आ.दु.घ. | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | दिव्यांग उमेदवार |
| | | अमागास | मागासवर्गीय/अनाथ/आ.दु.घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ.दु.घ. | |
| ३१ जानेवारी, २०२४ | १८/१९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

(एक) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना अनुज्ञेय असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

(दोन) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन अधिसूचना क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७/सेवा-३ (नि.मं.) दि.०२ नोव्हेंबर, २०११ नुसार अगोदर पासून नियमित स्वरुपात शासन सेवेत असणा-या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. पंरतु सदर जाहिरातीत नमुद १० मधील १) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी या संवर्गात कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी या जाहिरातीनुसार अर्ज करण्यास पात्र नसल्याने या शिथिलतेसही पात्र असणार नाहीत.

**८. शैक्षणिक अर्हता :**

८.१ **वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) पदासाठी:** सांविधानिक विद्यापिठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेली समान अर्हता.

८.२ **वैद्यकीय अधिकारी (विशेषज्ञ) पदासाठी:** सांविधानिक विद्यापीठाची (४.२) येथील नमूद अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदवी/पदविका किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किया द्वितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेल्या समान अर्हतेची पदव्युत्तर पदवी किंवा पदविका.

८.३ महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम, १९६१ ला जोडलेल्या भाग अ-१ अनुसूचित विनिर्दीष्ट केलेली शुद्ध आयुर्वेद मधील पदवी किंवा बीएएमएस पदवी/पदव्युत्तर पदविका/पदव्युत्तर पदवी.

८.४ ३१ जानेवारी, २०२४ या दिनांकापूर्वी अथवा दिनांकास आंतरवासिता (Internship) पूर्ण असणारे व NMC/MMC नोंदणी प्रमाणपत्र असणारे उमेदवारच पात्र ठरतील. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड न केल्यास अर्ज रद्दबातल ठरविण्यात येईल.

८.५ भारता बाहेर वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या उमेदवारांसाठी भारताची NBE परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य राहील. तसेच अर्जाच्या छाननी साठी त्याचे NBE परीक्षेतील प्राप्त गुणच विचारात घेतले जातील. NBE परीक्षेचे गुणपत्रक अर्जासोबत न जोडल्यास त्यांचा अर्ज रद्दबातल ठरविण्यात येईल.

८.६ उपरोक्त ८.१,८.२ व ८.३ येथिल नमूद शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारां व्यतिरिक्त अन्य शैक्षणिक अर्हताधारकांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

८.७ दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२४ सकाळी १०.०० पासून दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत नोंदणी शुल्कासह ONLINE अर्ज https://www.morecruitment.maha-arogya.com या संगणक प्रणालीवर भरता येईल.

**९. निवड प्रक्रिया :-**

९.१ काही विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदवी / पदविकेसाठी गुणांऐवजी GRADATION देण्यात येत असल्याने त्यांच्या गुणांबाबत निश्चितता ठरविता येत नाही व त्यामुळे गुणानुक्रम लावण्यास अडचण होते. सबब पदव्युत्तर पदवी/पदविका धारकांची, पदवी/पदविका निहाय एम.बी.बी.एस.च्या सरासरी गुणांवर स्वतंत्र गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

बीएएमएस मध्ये पदव्युत्तर पदवी/पदविका धारकांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी बीएएमएसच्या सरासरी गुणांवर प्रसिद्ध करण्यात येईल. यात बीएएमएस पदव्युत्तर पदवी/पदविका

धारकांना प्राधान्य देण्यात येत असून त्यांचा पुर्ण विचार झाल्यानंतरच बीएएमएस पदवीधारकांचा विचार केला जाईल.

९.२ एमबीबीएस/बीएएमएस पदवी परीक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुणांचे ९५ टक्क्यात परिवर्तन करण्यात येईल. (भारता बाहेर वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या उमेदवारांसाठी NBE परीक्षेतील प्राप्त गुणच विचारात घेतले जातील)

९.३ अनुभवाचे गुण देण्यासाठी एकूण सेवा विचारात घेताना प्रत्येक पूर्ण वर्षाकरिता १ गुण याप्रमाणे गुण देण्यात येतील. परंतु अनुभवाचे गुण जास्तीत जास्त ५ इतके राहतील.

९.४ अनुभवासाठी पुढील संस्थांमध्ये केलेली सेवा गुणांसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

I. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील संस्था मध्ये केलेली कंत्राटी व बंधपत्रित सेवा.

II. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागातील संस्थामध्ये केलेली कंत्राटी व बंधपत्रित सेवा (Senior अथवा Junior Resident) ग्राह्य धरण्यात येईल, परंतु पदव्युत्तर पदवी अथवा पदविकेचे शिक्षण घेताना बंधनकारक असलेली Resident म्हणून केलेली सेवा गुणांसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. तथापि, Post Graduation झाल्यानंतर जर अशी सेवा दिली असेल तर ती ग्राह्य धरण्यात येईल.

III केंद्र शासनाच्या सेवा

iv. केंद्र / राज्य शासन अंकित / अंगिकृत संस्था मधील सेवा.

V. महापालिकांमधील सेवा.

vi. इतर राज्यातील शासकीय सेवा (अनुभव प्रमाणपत्र इंग्रजी मध्ये असावे)

vii. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्र.वैखप्र-२०१३/प्र.क्र.२९१/१३/राकावि-२, दि.११.१०.२०१३ मध्ये “परिशिष्ट-अ” मधील शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयात केलेली सेवा.

९.५ उमेदवारांना गुण देण्याची पध्दत -

| **तपशील** | **एमबीबीएस/बीएएमएस शैक्षणिक अर्हताधारकांसाठी गुणांचे प्रमाण (Weightage)** |
|---|---|
| पदवी परिक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुण | ९५ टक्के |
| उपरोक्त परिच्छेद ९.४ मध्ये दर्शविलेल्या सेवांकरीता अनुभवाचे गुण | ५ टक्के<br>(प्रत्येक पूर्ण वर्षासाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण ) |
| **एकूण** | **१०० टक्के** |

९.६ पदव्युत्तर पदवी / पदविका धारक व पदवीधारक उमदेवारांचा अनुक्रमे विशेषज्ञ निहाय व निव्वळ एम.बी.बी.एस नुसार स्वतंत्र गुणानुक्रम लावण्यात येईल.

यात एम.बी.बी.एस. विशेषज्ञांसाठी खालील क्रम विचारात घेण्यात येईल.

१) अतिविशेषोपचार तज्ञ

२) एम.डी./एम.एस./डी.एन.बी.

३) मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या पदविका

४) एफ.सी.पी.एस.

५) सीपीएस पदविका

यात बीएएमएस पदव्युत्तर पदवी/पदविका धारकांसाठी खालील क्रम विचारात घेण्यात येईल

१) पदव्युत्तर पदवी
२) पदव्युत्तर पदविका
३) बीएएमएस

**१०.उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना:-**

१) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी ( सातवा वेतन आयोग वेतनस्तर, एस-२० रु. ५६१००-१७७५००) या संवर्गात कार्यरत असणारे नियमीत वैद्यकीय अधिकारी अर्ज करण्यास पात्र नाहीत व सदरचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. सदर बाब लपवून अर्ज केल्याचे कोणत्याही टप्प्यावर आढळल्यास त्यांना प्रक्रियेतून बाद करण्यात येऊन त्यांच्यावर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

२) अनुभवाचे गुण देताना प्रत्येक वर्षासाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण देण्यात येतील, परंतु १ वर्ष पेक्षा कमी सेवेसाठी गुण देण्यात येणार नाहीत.

३) उमेदवाराने सक्षम प्राधिका-याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

४) अनुभवासाठीच्या गुणांच्या मूल्यांकनासाठी ३१ जानेवारी, २०२४ हा अंतिम दिनांक राहील.

५) निवड प्रक्रियेसाठी विहित करण्यांत आलेल्या निकषानुसार गुणांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके / प्रमाणपत्रे यांच्या स्व-साक्षांकीत प्रती उमेदवाराने अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे, अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होईल.

६) उमेदवाराकडे अर्ज करण्याच्या दिनांकास महाराष्ट्राचे वैध अधिवास (DOMICILE) प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. तसेच सदर प्रमाणपत्र अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होईल. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल. तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषिक ८६५ गावातील रहिवासी शासन परिपत्रक दि.१०.०७.२००८ नुसार अर्ज करण्यासाठी पात्र आहेत. तथापि, त्यांनी सदर परिपत्रकातील विहीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७) उमेदवाराकडे अर्ज करण्याच्या दिनांकास महाराष्ट्राचे वैध NMC/MMC प्रमाणपत्र /Renewal Receipt असणे अनिवार्य आहे. तसेच सदर प्रमाणपत्र अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होईल.

८) शासकीय नियमानुसार लागू असलेल्या राखीव कोट्यातून अर्ज करणा-या उमेदवाराकडे अर्ज करण्याच्या दिनांकास वैध नॉन क्रिमिलेअर (NCL) प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. तसेच सदर प्रमाणपत्र अर्जासोबत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल करण्यात येईल. महिलांकरिता Non-Creamy-Layer प्रमाणपत्राची अट महिला व बालविकास विभाग, शा.नि.क्र.महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/कार्या-२, दि.०४.०५.२०२३ अनुसार लागु राहील.

९) प्राप्त अर्जांची छाननी करुन विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१०) गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणच्या उपसंचालक कार्यालयात मुळ प्रमाणपत्रांसह (छायांकित प्रती चालणार नाहीत) व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याबाबतचा तपशील स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. तथापि खाली नमूद कारणांसाठी उमेदवाराने प्राधिकारपत्र दिलेल्या व्यक्तीस कागदपत्र पडताळणीकरीता उपस्थित राहता येईल.

I. गर्भवती स्त्री उमेदवार ज्यांना प्रवास करण्यास अनुमती नाही (परंतु यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किंवा त्यांनी Counter Sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे)

II. उमेदवार स्वतः आंतररुग्ण म्हणून रुग्णालयात दाखल असेल तर (परंतु या साठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किया त्यांनी Counter Sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

III. नमूद दिवशी व नमुद वेळेत उमेदवार अथवा उपरोक्त (१०) नुसार प्रतिनिधी उपस्थित न राहील्यास नियुक्तीसाठी त्यांची निवड केली जाणार नाही व त्यांना त्याबाबतचा कोणताही हक्क सांगता येणार नाही.

IV. मूळ प्रमाणपत्रे शैक्षणिक कारणास्तव एखाद्या संस्थेत जमा असल्यास त्या संस्थाप्रमुखाचे सही शिक्यासह अर्जाच्या दिनांकाचे दिवशीचे मूळ प्रमाणपत्रे त्या संस्थेत जमा असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा निवड प्रक्रियेतून त्या उमेदवारास बाद करण्यात येईल.

११) विहित मुदतीत नियुक्तीच्या पदावर रुजू न झालेले उमेदवार त्यांच्या नियुक्तीचा हक्क गमावतील.

१२) उमेदवारांनी अर्ज करताना त्यांचे पदस्थापनेच्या ठिकाणाकरीता जास्तीतजास्त संस्थांचा पसंतीक्रम भरणे आवश्यक आहे. तद्नंतर उमेदवारांनी जिल्ह्याचाही पसंतीक्रम भरावा. उमेदवारांनी दिलेल्या संस्थेचा पसंतीक्रम संपल्यानंतर त्यांच्या पदस्थापनेसाठी त्यांनी दिलेल्या जिल्ह्यांचा विचार करण्यात येईल. पसंतीक्रमांक भरलेल्या ठिकाणी अथवा पसंती दिलेल्या जिल्हयामध्ये पदस्थापना मिळाली नाही तर सदर उमेदवाराला शासनाच्या निकडीनुसार पदस्थापना देण्यात येईल. तथापि अशा प्रकारची पदस्थापना स्वीकारण्याबाबत उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना पर्याय निवडावा.

## ११. सर्वसाधारण सूचना :

११.१ निवड झालेल्या उमेदवारांना दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी असेल.

११.२ महाराष्ट्र वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट-अ (सातवा वेतन आयोग, वेतनस्तर एस-२३, रू. ६७७००-२०८७००) या पदावर पदोन्नतीकरीता उमेदवारास संधी असून त्याकरीता त्या पदाकरीता आवश्यक असलेल्या अर्हता पूर्ण करणे आवश्यक राहील.

११.३ निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.

११.४ निवड झालेल्या उमेदवाराने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होतांना संबंधित कार्यालय प्रमुखास "ते किमान ५ वर्षाची शासकीय सेवा करतील किंवा न केल्यास शासनाने वेळोवेळी विहीत केलेली रक्कम दंड म्हणून भरण्यास तयार आहेत" असे बंधपत्र देणे अनिवार्य असेल.

११.५ सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि. १९.०७.२०२३ मधील अटी व शर्तीनुसार सदर उमेदवारास कमीतकमी ३ वर्षाची नियमित सेवा (रजा कालावधी वगळून) झाल्याशिवाय सेवांतर्गत पदव्युत्तर शिक्षणासाठी जाता येणार नाही.

११.६ जर निवड होऊन रुजू झालेला उमेदवार उपरोक्त नमूद कालावधी आधी परस्पर पदव्युत्तर शिक्षणासाठी गेल्यास, त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त कण्यात येतील.

११.७ निवड झालेल्या उमेदवाराचे जाहिरातीच्या दिनांकास महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र XLVI, १९६५) नुसार त्याचे/ तिचे नांव नोंद असणे अनिवार्य आहे.

११.८ उमेदवारांनी आवेदनपत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत आणि सत्यतेबाबत स्व-सांक्षांकित स्वयंप्रमाणपत्र अर्जासोबत UPLOAD करणे तसेच सदर प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीवेळी सादर करावे. स्वयंप्रमाणित सादर केलेली माहिती खोटी ठरल्यास अर्जदार नियमानुसार कारवाईस पात्र राहिल.

११.९ प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

११.१० प्रत्येक उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने फक्त एकच अर्ज सादर करावा. उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज भरल्यास सदरचे सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

## १२. ऑनलाईन अर्ज भरावयाची प्रक्रिया:-

१२.१ महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट "अ" या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्जाबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार https://www.morecruitment.maha-arogya.com या संकेतस्थळावरून सदर अर्ज पूर्णपणे ONLINE पद्धतीने भरावयाचा आहे.

१२.२ उमेदवाराचे अर्जाचे शुल्क केवळ ONLINE पध्दतीने स्वीकारले जाईल. इतर कोणत्याही पद्धतीने शुल्क स्विकारले जाणार नाही.

१२.३ स्वयंप्रमाणपत्र, विहीत शुल्क व आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज दिनांक ०१.०२.२०२४ सकाळी १०.०० पासून ते १५.०२.२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत या https://www.morecruitment.maha-arogya.com संकेतस्थळावर ONLINE पद्धतीने भरावेत.

१२.४ टपालाने अथवा अन्य मार्गाने सादर केलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

## १३. शुल्क :-

**उमेदवारांनी अर्ज सादर करताना खालीलप्रमाणे शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.** एकदा भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही.

- अराखीव प्रवर्गाच्या उमेदवारासाठी - रु. १०००/-
- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. ७००/-

उपरोक्त शुल्का व्यतिरिक्त बॅक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

स्थळ: मुंबई
दिनांक:- ३१.०१.२०२४

**स्वाक्षरीत/-**
**(वि.ल.लहाने)**
**सहसचिव तथा स्वतंत्र निवड मंडळाचे सदस्य सचिव**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**१० वा मजला, संकुल इमारत, गोकुळदास तेजपाल**
**रुग्णालय आवार मुंबई-४००००१**